Public Affairs Office
Embassy of the United States of America, New Delhi

PRESS RELEASE

Shantipath, Chanakyapuri, New Delhi 110021 Tel: 91-11-24198000 Extn.: 8814
Fax: 91-11-24198817 Visit us at: http://newdelhi.usembassy.gov

फेब्रुवारी ७, २०११,

अमेरिकी अणु ऊर्जा प्रयोगशाळेचे शिष्टमंडळ भारताच्या दौऱ्यावर

अमेरिकी सरकारच्या ऊर्जा विभागाच्या इडाहो नेशनल लेबोरेटरीचे अणु ऊर्जा वैज्ञानिक भारताच्या दौऱ्यावर येत आहेत. दोन्ही देशांमधील अणु ऊर्जा सहकार्याबद्दल आणि त्याच बरोबर दोन्ही देशांच्या अणु ऊर्जा विकासाच्या संधींवर चर्चा हे शिष्ट मंडळ करणार आहे.

या १० दिवसाच्या दौऱ्यामध्ये हे शिष्ट मंडळ सरकार आणि शिक्षण व उद्योग क्षेत्रातील विविध संशोधकांना भेटणार आहेत. मुंबई येथील दौऱ्यामध्ये ते इंडिअन इनस्टीट्यूट ऑफ टेकनोलोजी येथील उच्चपदस्थांना भेटतील आणि प्रयोगशाळांना भेट देतील. त्याच बरोबर न्यूक्लियर पावर कार्पोरेशन ऑफ इंडिया आणि नेशनल थर्मल पावर कार्पोरेशन यांच्या प्रतिनिधींना भेटतील.

शिष्ठमंडळाचे प्रमुख जॉन ग्रोसेनबैचर म्हणाले, " सर्व प्रगतीशील अणु ऊर्जा-संपन्न राष्ट्रांनी एकमेकांबरोबर आण्विक उद्योगांच्या माहितीची देवाण घेवाण केल्यास फायदा दोहोंना होतो."

भारत आणि अमेरिकेमधील नागरी आण्विक ऊर्जा सहकार्या संबंधी 123 कराराच्या वाटाघाटी दरम्यान इडाहो नेशनल लेबोरेटरी ने पहिल्या भारतीय-अमेरिकी समूह
बैठकीचं आयोजन केलं होतं आणि त्याच बरोबर जानेवारीमध्ये पार पडलेल्या कामकाज समूहाच्या दुस-या बैठकीला तांत्रिक मदतही दिली होती. या आगोदर इडाहो नेशनल लेबोरेटरीच्या शिष्ठमंडळांनी चीन, दक्षिण कोरिया, फ्रांस, कॅनडा आणि नॉर्वे या देशांना भेटी दिल्या आहेत.